# मंगेश

(प्रासंगिक कवितासंग्रह – भाग १)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**मंगेश** (प्रासंगिक कवितासंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : चैत्र कृ. १३, श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी,
शके १९४६, सोमवार दि. ०६ मे, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-970674-0-2

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



**ज्या माझ्या काकांचा खूप सहवास नाही लाभला तरी**
**वडिलांच्या त्यांच्यावरील निस्सीम प्रेमाने ते आमच्या**
**खूप जवळचे काका कायम ठरले त्या**
**कै.भुजंगराव दिगंबरराव कुलकर्णी, नागपूर**
**यांच्या पावन स्मृतींस हा**
**प्रासंगिक काव्यसंग्रह सादर समर्पित!**

# मनोगत

कवीचं जीवन हे कधीच रसिकांचं होऊन जातं, ज्यावेळी त्याच्या हातून रसिकांना भावणारं काव्य उतरत जातं. त्याचा आणि रसिकांचा एक ऋणानुबंध घट्ट होत जातो. सुरुवातीला हळूहळू विणत गेलेले हे धागे नंतर इतके पक्के होतात की त्यात हक्काचा सुवास दरवळू लागतो. वेगवेगळे प्रसंग येतात त्यावेळी मग रसिकांना यावरती आपल्या लाडक्या कवीने, कवयित्रीने कविता लिहून द्यावी असे भाव उमटू लागतात. त्यांना तसं वाटणं साहजिकही असतं आणि म्हणूनच कधी कुणाची निवृत्ती असेल, कोणाचा जन्मदिवस असेल, कोणाचे सुखद अथवा दुःखद क्षण असतील, संयोग, भेटीगाठी, वियोग असेल तर त्या निमित्ताने अशा प्रकारे केल्या गेलेल्या काव्यारचना या प्रासंगिक सदरात मोडतात.

अनेकवेळेला रसिकांची अशीही इच्छा असते की आज त्यांच्या आवडीच्या एखाद्या नट-नटीचा, अभिनेता वा अभिनेत्रीचा जन्मदिवस आहे आणि त्या निमित्ताने त्या अभिनेत्यावर, त्या अभिनेत्रीवर काव्य लिहिल्या जावे. तशाही प्रकारच्या रचना मग माझ्या हातून होत गेल्या.

कधी कधी सणवार आणि विशिष्ट दिनाच्या निमित्ताने त्या दिवसांचं, त्या सणांचं महत्त्व सांगणाऱ्या, अधोरेखित करणाऱ्या कविताही रचल्या गेल्या.

प्रसंग म्हणजे आयुष्याचा अविभाज्य घटक असतो. अनेक सुंदर सुंदर प्रसंगांनी आयुष्याच्या या छान छान घटना ठळक होत जातात आणि म्हणूनच त्या त्या प्रसंगांना रचल्या गेलेल्या ह्या कविता म्हणजेच ते प्रसंग सजीव करणे, ठळक करणे असंच ठरतं. माझ्या लेखणीतून अशा नानाविध प्रसंगी रचल्या गेलेल्या अनेक कविता या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून पुन्हा रसिकांपर्यंत पोहोचवताना अतिशय आनंद होत आहे.

प्रसंगवशात् जन्माला आलेल्या कविता त्या प्रसंगांना दिमाखदारपणे मोठं करत गेल्या. कधी कुणाच्या मनात आपुलकीचा झरा वाहवत गेल्या तर कधी सणाचा गोडवा वाढवत गेल्या. कधी सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आपले कृतार्थ भाव प्रकट करत गेल्या, कधी जन्मदिवसाच्या शुभेच्छा शब्दांनी भेट देत गेल्या. हे सारे प्रसंग कवयित्री म्हणून माझ्या मनाला स्पर्शून गेले, आपलेसे होत बाहेर आले आणि म्हणूनच ते कधी वेगळी प्रसंग असे वाटलेच नाहीत.

या प्रासंगिक कवितांचा हा काव्यसंग्रह म्हणजे भिन्न भिन्न प्रकारच्या अनेक फुलांचा जणु पुष्पगुच्छ आहे जो रसिकांच्या हाती देत त्यांच्या आशीर्वादाची कामना करते.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

डॉ. मंजूषा कुलकर्णी या प्रथितयश कवयित्रीचा विविधरंगीं गीतांचा काव्यसंग्रह पुस्तकरूपाने रसिकांच्या भेटीस येत आहे. त्यांचे स्वागत व शुभेच्छा या हेतूने हे दोन शब्द. कविवर्य भा.रा. तांबे, मंगेश पाडगावकर, गदिमा इत्यादी श्रेष्ठ गीतकार कवींची परंपरा मराठीत आहे. कवी ग्रेस, आरती प्रभू, शांताबाई शेळके, सुधीर मोघे यांच्या कविता अजरामर आहेत. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी विविध प्रकारच्या गीतरचना केलेल्या आहेत. त्यात स्फूर्ती गीतापासून, निसर्ग गीते, भक्ती गीते, प्रेम गीते असे सर्वच रंग अगदी विनासायास आलेले आहेत. आजवर अनेक कवितासंग्रह, साहित्य वाचनात आले; परंतु डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या काव्य साहित्यातून संस्कृतीचे आणि जीवन तत्त्वज्ञानाचे एकत्रित होऊन आले आहेत. तुमचा विश्वास बसणार नाही जगण्याची अनुभूती देणारे हे असे काव्य प्रत्येक वाचणाऱ्याला वाटेल हे निश्चित. समृद्धी, संपत्ती, नातीगोती, मैत्री, सुख समाधान, यश, आनंद, यात आपण क्रियाशील असतो.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या कविता वाचताना आपल्यामध्ये लपलेल्या अप्रकट आंतरिक शक्तीची जाणीव तुम्हाला होऊ लागेल आणि ही जाणीवच तुमच्या जीवनात आनंदाची मुक्त उधळण करील. देशाच्या राजधानीत सरकारी क्षेत्रात मराठी स्त्री अधिकारी म्हणून काम करीत असताना, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात वाढ करण्याचे काम त्या निष्ठेने करीत आहेत. महाराष्ट्राची संस्कृती आणि मराठी माणसाविषयी असलेली नाळ त्यांनी निष्ठेने जोपासली आहे. शासकीय अधिकाऱ्यांमध्ये अशी जाणीव असणे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरू शकेल. मराठी आणि संस्कृत भाषेच्या जोपासणीसाठी त्या करीत असलेले कार्य अद्वितीय आहे. डॉ. मंजूषा कुलकर्णी या प्रशासन, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य, शैक्षणिक कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतील.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या कविता वाचताना मला अतिशय आनंद झाला. एक कवयित्री उत्तम प्रकारे साहित्य क्षेत्रात आपल्या प्रतिभेचा ठसा उमटऊ पाहत आहे ही मोठी कौतुकास्पद आणि अभिनंदन या बाब आहे. त्यांच्या कवितांचे गाणे व्हावे हीच अपेक्षा.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना माझ्या मनापासून शुभेच्छा.

**मिलींद सरदेशमुख**
निवृत्त शासकीय अधिकारी, मुंबई
मोबाईल - ९८६७९९४३८९

# अनुक्रमणिका


१) अंतरातले सोने द्यावे ... ९
२) माय शाळेचे सांगणे ... १०
३) वांगं काटेरी काटेरी ... ११
४) तुझे अवतरणे
भारत भाग्य ... १२
५) चंद्र उतू जाताना ... १४
६) कोजागिरीला दे दान ... १५
७) शुभ शुभ दीपावली ... १६
८) धनत्रयोदशी ही हसावी ... १७
९) भावा बहिणीची माया ... १८
१०) आपुलकीचा
नित्य सुवास ... २०
११) पंचमी आली की ... २१
१२) दैवी रक्षक ... २२
१३) एक भेट ऐशी
दीपक व्हावी ... २३
१४) स्मित हास्याचा ... २४
१५) घडो ऐसा उपवास ... २६
१६) सुंदर विवाह सोहळा ... २७
१७) इथं आसुसलेले डोळे ... २८
१८) होत गंध बकुळाचा ... २९
१९) संक्रांतीसाठी ... ३०
२०) सन्मान तू हे भारता... ... ३१
२१) रती पुतळा देखणा ... ३२
२२) रंग प्रीत भरले ... ३३
२३) राधेश्याम रंगनाम ... ३४
२४) रंग असे कोणते ... ३५
२५) चिवचिव गाण प्यारे ... ३६
२६) श्रीमंती कशाची ... ३८
२७) एक युगातली माय ... ३९
२८) नमो प्रभो श्रीराम ... ४०
२९) राम राम श्रीराम ... ४२
३०) अक्षय हो आराधना ... ४३
३१) खरंय ना ग पत्रपेटी ! ... ४४
३२) मस्तक झुकते
मज गुरुचरणी ... ४६
३३) कालिदासा आज
ये जन्मा पुन्हा ... ४७
३४) गुरु ... ४८
३५) आज दीप अमावस ... ४९
३६) शुभ शुभ दसरा ... ५०
३७) सर्ग निसर्ग हासरा ... ५१
३८) श्रीकर नाव हे सार्थ ... ५२
३९) पसरू दे तव
कर्मसुगंध ... ५३
४०) चला करू या
सण हे साजरे ... ५४
४१) तेज भारत हा जाण ... ५६
४२) चंद्र मनातून
जागा आहे ... ५७
४३) कसला लळा हा ... ५८
४४) कोजागिरीच्या
शारद राती ... ५९
४५) शुभदीपावली तुम्हा ... ६०

४६) धनत्रयोदशी आरोग्यधन
साधण्यासी ... ६१
४७) दीपावली मंगल होते... ... ६२
४८) अंजलीत मी
तेजा भरले... ... ६३
४९) एक दिवाळी किती
आठवणी ... ६४
५०) पुन्हा एकदा दिवाळी ... ६५
५१) गुरुकृपेची मंजूषा ... ६६
५२) तू सदा माझ्या
मनाला भाळवावे ... ६७
५३) मधुर माधुरी छबी ... ६८
५४) सांडले हास्यात मोती ... ६९
५५) लता संजीवन ... ७०
५६) ऐक माधुरी
धडधड हृदयी ... ७१
५७) एकंच सापडला मास्क ... ७२
५८) एक सुगंधी
गुढी मनातून ... ७३
५९) चला दिवाळी
करू साजरी ... ७४
६०) दिवाळी, तूही
तशीच रेंगाळशील ... ७६
६१) मुजरा घ्या मानाचा ... ७८
६२) मुजरा घ्या मानाचा ... ७९
६३) न्हाऊन निघू प्रकाशी ... ८०
६४) लक्ष्मीपूजन
करता श्रद्धेने ... ८१
६५) सदैव घडू दे
तुझी अर्चना ... ८२
६६) तुझी माझी मैत्री ... ८३



## (१)
## अंतरातले सोने द्यावे

एक शमीचं झाड शरीर हे
पांडव पंचेंद्रिये
अगणित लपवून आत वासना
लढण्या शस्त्राचिये

वनवास हा भोगून झाला
आता अज्ञातवास
अभिधानहीआपुले नाही
बदलून घ्यावे खास

खरी ओळख ही लपवत माणूस
जन्म घालवी अज्ञात
सत्य तत्त्व आत असते
वरवरे ना होई ज्ञात

जेव्हा युद्ध आले नजीक
शमीवरची शस्त्रं निघाली
शेकडो अविचारांचे कौरव
हनन करण्या परजून गेली

मग युद्ध चाले आपुले आपुल्या
बांधव शत्रूरूपी विचारे
पंच पांडव सोबत कृष्ण
आत्मा सारथी होत विचरे

तो शस्त्र ना उचलील तेंव्हा
शस्त्र पांडवे चालवायची
विवेक दृष्टी गीतामृताने
तमो दृष्टी घालवायची

विजय होईल नक्कीच तेव्हा
ज्ञान नि कर्म इंद्रिये दहा
विजय यांच्या वरती मिळता
विजयादशमी घडे पहा

शमन करावे ज्या देहाने
शमीत उगवते हो सोने
हृदय सोने बुद्धी सोने
चिंतन सोने कणकण सोने

विजय मिळविता सारे सोने
लुटून घ्यावे सद्कर्माने
ईश्वर त्याच्या सोबत राही
वर्तन ज्याचे असे धर्माने

अंतरातले सोने द्यावे
घ्यावे आपण आपुल्यास ते
जन्म सार्थकी होईल सोने
पांडवे शस्त्रे काढिल्यास ते

दि.०५/१०/२०२२
सकाळी ०७.११ वा.



## (२)
## माय शाळेचे सांगणे

ओस पडलेल्या शाळा
गुपचूप भिंती फळा
सारे बाकडे तसेच
वर्गखोल्या ओक्या बोक्या

चिवचिव पाखरांची
आता ऐकू येत नाही
कोणी शाळेच्या अंगणी
आता बागडत नाही

नाही कविता गायन
पाढे रटनेही नाही
चिमण्या लेकरांची गोड
किलबिल कानी नाही

शाळा माय माऊली ही
वाट पाहते घरात
कधी येतील ग बाळं
शिकायला ती भरात

त्यांच्या डब्यांचे गोडवे
वह्या पुस्तकांचा थाट
सारे आठवून माझ्या
डोळ्यातून जलपात

स्वागताला तुमच्या रे
मी उत्सुक आहेच
हाती गुलाब घेऊन
अशी तिष्ठत राहेच

या रे या रे हुंदडत
खिदळत सारे या रे
पुन्हा पहिल्यासारखी
होवो सुरळीतता रे

काही होऊ नये कोणा
सारे सुखरूप रहा
माय शाळेचे सांगणे
ज्ञानवंता दिशा दहा

दि.३१/०५/२१
दुपारी ०२.४२ वा.



## (३)
## वांगं काटेरी काटेरी

वांगं काटेरी काटेरी काटेरी
गावरान चवीच्या वाटेरी

अंगणात आलं बहरून नवं
रंग जांभळींी देठ हिरवं
ताजंतवानं बिया टचटचीत
पाहताच वाटे कधी खावं

कुणी म्हणतं कृष्णाकाठची चव
कुणा जळगावी भरीत ठावं
कधी काळसर, निळं जांभळं
हिरवं पांढुरकं रूप पहावं

कधी काट्यांनी चव राखली
कधी भरिता गुळगुळली
भरलं वांगं  ठेचा कुटावा
जवार बाजरी भाकरी खावा

कधी राठ वांगी पिवळी तोडा
तुरदाळीत गाळ शिजवा
मसाले टाकून तडका फोडणी
गरगटं नाव चविष्ट देणी

वांगी भात, मसालेभाताची चव
भोगीची भाजी वांग्याने नवं
फोडीची भाजी बटाटे जोडी
लग्नकार्याची खमंग गोडी

सुकं करा की करा रस्याचं
भरून करा की चटपट लोणचं
चातुर्मास करी पाळे उपवास
श्रीखंडेरायासी रोडगा भरीत

काय हवं अजून वांगं अन्नमय
पुराणातली वांगी पुराणी ठेव
वांगं न बांगं बिचारं सांगं
दिसतं त्याला मनीचं सोंगं

खाण्याला जीभ पाणीपाणी गं
चव त्याची जात नाही खमंग
सुवास दरवळे दूरदूर
प्रेमाला वांग्याच्या आलाय पूर

दि.२८/०१/२१
सकाळी ०८.०३ वा.



## (४)
## तुझे अवतरणे भारत भाग्य

गोकुळाष्टमी प्रकटला हरी
मध्यरात्रीला मथुरी
देवकी वसुदेवाची पुण्याई
अवतरली खरोखरी

अवताराचे कार्य म्हणा की
लीला परमात्म्याच्या
किती जोडले बंध साजिरे
खुणा भूवरी त्याच्या

गोकुळात गेला श्रीहरी हा
त्याच रात्रीला जेव्हा
भरले गोकुळ नंद घरातील
यशोदा हर्षली तेव्हा

जन्माची धनी जरी देवकी
पिता जाहला वसुदेव
केले घराणे उजळ देवाने
ख्याती झाली वासुदेव

क्षणिक सुख ते तिला लाभले
कृष्णा कवटाळून देवकी बोले
आलास माझ्या पोटी बाळा
सार्थक माझे जीवन झाले

नको परी तूज दुष्टकंसाचे
सावट काळ्या त्या मृत्यूचे
कूस उजवली उजळ होऊ दे
बाळ दीर्घायु माझे होऊ दे

बाळलीलांच्या कथा गोड त्या
तारुण्यातील शौर्य गाथा
बोध दिला रे गीतामृत तू
धर्मविमूढशा शिष्या पार्था

नवनीतातील बाल्य विरम्य
राधा गोपिका रास सुरम्य
गोपाळांचा भवती मेळा
काला प्रेमाने चविष्ट केला

चक्र सुदर्शन फिरले जेंव्हा
अधर्म संपून गेला तेंव्हा
मुरली तुझी ते स्वर स्वर्गाचे
सूर लाभले जन्मार्थाचे

तुझे अवतरणे भारत भाग्य
भक्ती तुझी हे मम सौभाग्य
तू भाग्येशा हे परमेशा
नमन घेई रे परात्परेशा
नमन घेई रे परात्परेशा

दि.१७/०८/२०२२
रात्री ११.१५



## (५)
## चंद्र उतू जाताना

चारू चंद्रमा तुझी लालिमा
आज खुलुनी येते
को जागर्ति विचारते ही
लक्ष्मी रात्रीला फिरते

आज सुधाघट चंद्र बरसवी
नभी  मोहवत राही
अशी मोहिनी या जगतावर
शरद पौर्णिमा पाही

आरोग्याचा मंत्र जागरण
कोजागिरीच्या राती
शशी किरणांच्या मंडपातली
खुली खुलणारी नाती

अशी कळावी प्रीत मृदुलशी
मन हळवे असताना
हात प्रिया तुज हाती असावा
चांदण्यात बसताना

उधाण येते मज ह्रदयाला
चंद्र उतू जाताना
तुला पाहते हळुवार मी
सुधांशु मम होताना

रात्री १०.३५ वा.
कोजागिरीच्या हार्दिक शुभेच्छा



## (६)
## कोजागिरीला दे दान

तुला कसे सांगू बरे
काल चांदवा उतरे
माझ्या घरट्यात आला
मन चांदणं झालं रे

त्याची हौस शरदाची
आत कुपी अमृताची
आज वेगळा वाटला
जवळून की भेटला

म्हणे जागणार आज
रातभर आहे तू ना
म्हटलं जगणार आज
जणू आयुष्यच मी ना

त्याच्या चांदण्यात सारा
जीव माझा झाला गोळा
कशी दिलीस रे बाबा
सांग प्रीत कशी तोळा

म्हणे मीही तळमळे
खऱ्या खऱ्या प्रेमासाठी
एक राधा ती होती ना
जशी सावळ्याच्या साठी

असे प्रेम नाही दुजे
त्रिखंडात सदा गाजे
साक्षी होता साऱ्यांसाठी
आस माझ्या मनी जागे

आज मोडल्या मी सीमा
तुला प्रतिबिंब देण्या
कवयित्री तू लाडाची
काव्यचांदणे ते पिण्या

मांड माझ्याही व्यथा तू
प्रेम भंगल्या कथा तू
कोजागिरीला दे दान
चांद चकोरासी गे तू

दि.१०/१०/२०२२
सकाळी ०९.३२ वा.



## (७)
## शुभ शुभ दीपावली

अश्विन वद्य द्वादशीला
वसुबारस तिथीला
सवत्स ही धेनु दारी
मनोभावे पूजनाला

देवदैत्यी सागरमंथन
पंच कामधेनू आल्या
नंदा नामा कामधेनू
व्रत तिच्या स्मरणाला

पूजा गोधनाची होता
प्रसन्नता धेनु मना
पूर्ण गोवत्स कृपेने
जन्मोजन्मीच्या कामना

दारी रांगोळी काढावी
धेनु वत्सा न्हाऊ घाली
लावी हळद सर्वांगा
सुरू झाली हो दिवाळी

नवी वस्त्रे त्यांना द्यावी
अंगी चढवून छान
आज नैवेद्याचा त्यांचा
आहे खरोखरी मान

न खावी गव्हाळी मुगाळी
कोणी उपवास धरी
भाजी गवारीची खावी
जोडी बाजरी भाकरी

कृषी उत्पन्न वाढावे
मुलंबाळं सुखी रहावे
त्यांना आरोग्य लाभावे
आज गोधन पुजावे

तिन्ही सांज तुळशी दारी
पणत्या दिव्यांची अवली
लखलख तेजात बुडावी
रोषणाई दीपावली

आली आली दीपावली
शुभ शुभ दीपावली

दि.२१/१०/२०२२
सकाळी ०९.२१ वा.
वसुबारस,दीपावली प्रारंभ
तेजोमय शुभकामना



## (८)
## धनत्रयोदशी ही हसावी

माते लक्ष्मी धनधान्याने भरलेली तू रहा
संगे गजानन कुबेरासही पुजतो आम्ही पहा

आज धनत्रयोदशी शुभतिथी स्त्रीस्नानाचा मान
अभ्यंगाचे सुगंध दरवळ ,गंधित जीवन पान

देई गजानन,तू विद्याधन अशी ज्ञानसम्पदा
हरतील साऱ्या त्या तेजाने अज्ञानी विपदा

धनधान्यसंतानविजयविद्यागजवीरभाग्यादी
अष्टलक्ष्मी तू कृपा बरसवी प्रसन्न हो आधी

धन्वंतरी तुम्ही वैद्यराज प्रगटला आजच्या दिनी
सागरमंथनी अमृतकलशी सांभाळून हो झणी

आरोग्याची द्यावी संपदा शिंपडून मंत्र
आम्ही जपावे देहारोग्याचे नित हो तंत्र

येई कुबेरा,खजिनदारा,देवांचा भंडारी
भरले असू दे वित्त सुवर्ण नि घर आमुचे भांडारी

दिपले डोळे सर्परूपी यम प्राण न हरण्याला
तेज दिव्यांचे पाहून परतून यम गेला सदनाला

हेमा राजाच्या पुत्रा वाचवी अपमृत्यू हा चक्क
द्यावे यमाला सायंकाळी दीपदान ते लख्ख

म्हणून उजळून अशी दिवाळी घरीदारीही वसावी
धनधान्याचे पूजन करता ,धनत्रयोदशी ही हसावी

दि.२२/१०/२०२२
सकाळी ०७.११ वा.
धनत्रयोदशी ,शुभ दीपावली



## (९)
## भावा बहिणीची माया

कार्तिक शुद्ध दितीया
हा भाऊबीज सण
छटा दोघांच्या स्नेहाची
एकमेका जाणू मन

साऱ्या साऱ्या नात्यांना
जपणे असे व्हावे
श्रेष्ठ आपुल्या संस्कृतीचे
किती ऋणी रहावे

यमा ला ओवाळीले
यमीने जे प्रथम
यम धावला सदाच
यमीसाठी त्याचे प्रेम

ओवाळणी त्याने दिली
दिल्या भेटी नि उपहार
जेंव्हा यम मृत झाला
यमी हेलावली फार

तिचे रुदन थांबेना
काही देवांना सुचेना
मग निशा निर्मीयली
तेंव्हा यमी विरमे ना

यम यमीची ही प्रथा
आहे सनातन जुनी
भावा बहिणींचे बंध
कसे जाणले हो कुणी
मिळो दीर्घायुष्य सुख
माझ्या भावाला रे देवा
असो सख्खा नात्यातला
असो मानलेला भाऊराया

कोणी नसेलच जर
चंद्र भाऊ होत जातो
ओवाळून घेण्यासाठी
कोरीतून उगवतो

कोणी चित्रगुप्त पूजा
मनोभावे करतात
दौत टाकाची ही पूजा
प्राक्तनास भरतात

आज यमद्वितीया ही
करू साजरीशी छान
स्नान यमुनेच्या जळी
आज विशेष हा मान

अशी दिवाळीची गोड
सांगता मनात ठेवा
भावा बहिणीची माया
एक अनोखाच ठेवा

दि.२६/१०/२०२२
रात्री ०७.५३ वा.
भाऊबीज शुभकामना



## (१०)
## आपुलकीचा नित्य सुवास

घरात सारे चैतन्याचे
वाजत राहावे फटाके
एकजुटीने फराळ बनवू
आरास दिव्यांची साजे

सासू सुना अशा एकमनाने
ओतून सारे प्राण
चव निराळी मूर्त आपुलकी
फराळास ये शान

अवतीभवती गोळा बालके
सुगंध खेचून आणील
कधी करंजी पोटात जाईल
जो तो पहा घुटमळील

दरडावून मग आजीच सांगेल
अं.. हं.. असे खायचे नाही
जे जे करतो आधी देवाला
नैवेद्य ठेवता की नाही?

मग आई जाय देवघरातील
देवासंगे बोले
हे घे देवा तुझ्या कृपेने
सारे विश्वची चाले

सुखी असू दे घर भरलेले
मुलेबाळे आमुची आनंदी
तुला घे पहिला फराळ खावा
रोज नैवेद्या... पुरण बासुंदी

दरवर्षी जी येते दिवाळी
घरात एकी असू दे
लक्ष्मी सदा सरस्वतीसह
संपदा विद्या वसू दे

लाडू करंजी शंकरपाळी
चकल्या चिवडा शेव कडबोळी
बालुशाही कडबू सांजोऱ्या
अनारसे घाऱ्या पुऱ्या तळी

सांज उजळते लक्ष दिव्यांनी
मनात उजळून येई प्रकाश
अशी मायेची जमता माणसे
आधार किती वाटतो जीवास

पुन्हा घडू दे भारतात असे
एक कुटुंब एकच ध्यास
सणावारांना येत राहू दे
आपुलकीचा नित्य सुवास

दि.२२/१०/२०२२
सकाळी ०७.१५ वा.



## (११)
## पंचमी आली की

पंचमी आली की मन
झोक्यावर झुलतं
माहेरच्या वाटेनं वेडं
सुसाटसं पळतं

आई भरते चुडा नवा
हात माझा किणकिणतो
मेंदीच्या नक्षीने
श्रावण कसा गुणगुणतो

माहेरवाशीण हुंदडते
अंगणात बागडते
मैत्रिणींच्या घोळक्यात
बालपण दौडत येते

कोपरावरच्या वडाला
झुले किती टांगलेले
झुले कसले आनंदाचे
क्षण त्यावर बांधलेले

सारं काही विसरून भान
आकाशाला शिवायचं
भुईवर यायचं पण
उडण्याचं स्वप्न जगायचं

त्रास सारे उडतील हवेत
हलकं मन हलकं तन
उंच झोका घेता घेता
गवसेल मला खरं जीवन

मनसोक्त असं हिंदोळ्यावर
सैल सोडून सारं अंग
हात मात्र वास्तवाच्या
दोरीला घट्ट तंग

पंचमीच्या सणाला
झोके कसे वाट पाहतील
थकल्या आईच्या डोळ्यातुन
मायेचे ते पाट वाहतील

हल्ली होत नाही जाणं
पंचमीला माहेरी
माहेर सारं डोळ्यात दाटतं
हसू जरी ओठावरी

दि.२४/०७/२०२०
रात्री ०९.२३ वा.



## (१२)
## दैवी रक्षक

दीपस्तंभावरी विसावून
राजभवन टेहळणी
निरीक्षणाला बसली आहे
दक्ष एक मोरणी

राजभवन ऐटीत उभे हे
दिमाखात थांबते
शान आन बान महाराष्ट्राची
इथूनच सांगते

पावित्र्यचि जणू जपण्या इथले
मयूर विहर विहरती
केकारव किती मधुर पसरतो
सागरास ये भरती

तोही इथल्या खडकांवरती
नमने कितीदा करतो
रत्नाकर जणू मनुष्य रत्ना
अभिवादने स्मरतो

कोण येतसे कोण जातसे
कुशल हे सारे आहे ना
उंच चढुनिया मोर लांडोरी
जातीने पाहते ना

विरक्त कोणी आला साधू
पालनास राज्याच्या
देवभूमीतून आला आहे
स्वर्गासम पृथ्वीच्या

मुखी शारदा वसते याच्या
विचार चिंतन गहन
निर्लोभी या श्रेष्ठ जनाचे
करण्या अनुमोदन

वाहन असती सरस्वतीचे
इथे सहजी वावरती
मोर कळप हे राजभवनचे
दैवी रक्षक होती

चित्र देखणे प्रवेशद्वारी
मोरनजर ही भरारी
सदैव राहो पत ही इथली
उन्नत उंच करारी

दि.०८/०९/२१
सकाळी ०८.३७ वा.



## (१३)
## एक भेट ऐशी दीपक व्हावी

सहस्र विचार बुद्धीला धार
मतास जोर जगण्या सार

घरी आले आज विनय साकार
गुणग्राही स्वयं गुणी अपार

महत्वाकांक्षा जाणून साऱ्या
थोर उदात्त उमद्या भराऱ्या

कर्तव्य उंची कार्य महान
लहानांसवेत सहज सान

वाटले त्यांच्यासम मी व्हावे
राष्ट्र उद्धरी आयुष्य जावे

भारतमातेचरणी नोबेल मी वहावे
दीपस्तंभ होत त्यांनी पहावे

चाले साधना मज साहित्यसेवा
घडू दे देवा मौलिक ठेवा

मनुष्य किती भेटण्या आले
विनयजी मनात राहून गेले

एक भेट ऐशी दीपक व्हावी
तेजाने कर्माच्या उजळून जावी

दि.२६/१०/२१



बालपणीचा स्पर्श आजीचा
तेलासंगे प्रेम मुरवितो
आई जेव्हा न्हाऊ घालते
केसांवरूनी कर तो फिरतो

आजही कधी बसता ऐशी
आठवण येते स्नेहाची
या केसांवर होती माया
साऱ्या साऱ्या सखीजनांची

बालपणीची ओळख होती
लांब केसांची ती मुलगी ना
या केसांनी किती भरभरून
केली जवळीक अन सलगी ना

गुंतून जातो जिवलग साथी
सखा जिवाचा रमतो यातची
वेणीमधल्या पेडांमधुनी
नागमोडी हा रस्ता चाली
कधी सोन्याचे फूल झळकते
कधी सुवासिक सुमने वरती
गजरा ऐटीत बसतो रुळतो
प्रियवर स्वतः केशी माळतो

## (१४)
## स्मित हास्याचा

स्मित हास्याचा जणू साठला
लांब केशसंभार
अनुवंशाची असे देणगी
की सत्त्ववृत्ती अवतार

कर्म सुचारु देही मुरले
सुकेशीनीच्या केशी रमले
पुण्य जसे हे वाढत जाते
केशकलापी तेज चमकते

कधी अंबाडा घट्ट सैल वा
भोवती वेणी शेवंतीची
कधी लाटा या केसांमधल्या
होऊन जाते सागरवेणी

निगा मी यांची घेते नेहमीच
म्हणून साथीला तेही खुशीतच
ओळख कीर्ती सौंदर्याची
खूण भारतीय सुंदरतेची

कधी धुपारे कधी हे वारे
कधी कोवळे ऊन खाऊनी
पोसत जाती वाढत राहती
मजला खुश ते सदा पाहुनी

किती बक्षिसे मिळवून देती
आणिक हसती गालावरती
बटा रुळती या आपुलकीने
शोभून दिसते स्मिता तर ती

दि.०२/०१/२०२१




## (१५)
## घडो ऐसा उपवास

देवप्रबोधिनी अशी
देवा आज एकादशी
चातुर्मास संपताना
मन तुझ्या पायापाशी

कार्तिक एकादशी दिनी
सोड देवा तू निद्रा रे
योगनिद्रेमध्ये तुझी
किती मोहक मुद्रा रे

आषाढाच्या एकादशी
दिवशी जी सुरू झाली
ऐसी दिव्य निद्रा तुझी
देख आजची संपली

सहस्राश्वमेध आणि
शत राजसूय यज्ञ
फळ मिळे आज करिता
उपवास म्हणे प्राज्ञ

पाप भस्म होऊनिया
वैकुंठाची गती मिळे
जपतप स्नान होम दान
सारे अक्षयची फळे

तुझ्या निकटचा वास
घडो ऐसा उपवास
देवा श्वास घेता तुझा
मज यावा रे सुवास

दि.०४/११/२०२२
सकाळी ०८.२३ वा.



## (१६)
## सुंदर विवाह सोहळा

कार्तिक शुद्ध द्वादशी ते
कार्तिक शुद्ध पौर्णिमा
तुळशीचा हो विष्णुसंगे
विवाह लावा पवित्रमा

दारामधली तुळस होते
गृहस्थाश्रमी कन्या
तिच्या विवाहाचे जणू पुण्य
लाभून जाते गृहधन्या

वृंदावन हे गेरूलेपित
बोर चिंच आवळा
वरण्या येतो तुळशीराणी
वर कृष्ण सावळा

मंगल ऐसें वातावरण
मंगल सूर निनादती
मंगल अष्टक सुरू होऊन
मंगल वाद्ये वाजती

लक्ष्मीरूप तुळशी वरिते
प्रियतम विष्णू सावळा
जेथ लक्ष्मी तेथ रमापती
सुंदर विवाह सोहळा

यांच्या विवाहानंतर मानव
विवाह मुहूर्त आरंभ
विष्णू लक्ष्मी आशीर्वादे
एक नवीन प्रारंभ

दि.०५/११/२०२२
सकाळी ०७.०९ वा.



## (१७)
## इथं आसुसलेले डोळे

माया निथळते सिंधू
बिंदू अनाथांचे सांधू
ओढ आंतरिक होती
घर मनात ग बांधू

प्रेमस्पर्श भाषा तिची
नजरेत गे वात्सल्य
माय साऱ्या लेकरांची
ज्यांचे हरवले बाल्य

काही जन्मती विभूती
जगताच्याच कल्याणा
निज जीवन बोजड
मन समाजाचे होण्या

दुःख पेलणे ना सोपे
फरपट किती हाल
तरी मायेचा आधार
झाले सनाथ ते बाल

देव अवतरती ना
नित्य रुपात आईच्या
आज देवही सनाथ
ऊब कुशीत माईच्या

ये ग ये ग सिंधू माई
तुला पुन्हा जन्म घेणे
इथं आसुसलेले डोळे
त्यांना स्वप्नं एक देणे

दि.१०/०२/२०२२
रात्री ११.३८ वा.



## (१८)
## होत गंध बकुळाचा

चिमुकल्याशा पाहुण्या
आलास असा पोटी
भाषा बाळबोध आली
आपसूक माझ्या ओठी

झाले वाटते सार्थक
पूर्णता जणु आली
किती वर्षाने देवाची
असीम कृपा झाली

तुझी वाट पाहताना
डोळे किती आसुसले
आज हाती घेत तुला
बाप नयन रे ओले

होत गंध बकुळाचा
दरवळशील जेंव्हा
मी सुगंधित बाळा
तुझ्या सुरभीत तेंव्हा

तुझ्या रुपात जगेन
जगतात मी अखंड
तुजला बाळराजा
औक्ष मिळू दे उदंड

दि.०२/१२/२०२२
रात्री ११.११ वा.
डॉ.अजित भाले यांच्या पुत्रप्राप्ती
आनंदात



## (१९)
## संक्रांतीसाठी

तिळातिळाने वाढो स्नेह अन
गुळागुळाने प्रीती
युगायुगाची सूर्य चालतो
मकर संक्रमण रीती

बारा राशी बारा मास
कालगणनेचा ध्यास
उत्तरायणी शुभ सृष्टी ही
जगण्याची नव आस

देहामधले स्नेहन वाढो
म्हणून तिळगुळ खाणे
शीतल थंडी अलगद येते
सुसह्य ऋतूंना करणे

एक तीळ सात जणात खाल्ला
दानत सांगे बिचारा
प्रेम हृदयी जर असेल तर मग
प्रेमालाच विचारा

किती महान ही असे देणगी
प्रेम स्नेह आपुलकी
तिळगुळ घेऊन मधुर बोलणे
मधुर बोलकी नाती

सण उत्सव हे औषध सुंदर
आयुष्याच्या गाठी
तिळगुळ घ्या गोड गोड बोला
ब्रीद संक्रांतीसाठी

दि.१५/०१/२०२३
सकाळी ०७.२३ वा.



## (२०)
## सन्मान तू हे भारता...

अभिमान तू मम मान तू
सन्मान तू हे भारता

मज करांनी आरती घे
देश देवा भारता ।।धृ।।

कर्म माझे अविरतसे
देशसेवा नित घडो
स्वर्सुखे माझ्यामुळे रे
चरणतली तुझिया पडो
विश्वगुरू साकारता

अभिमान तू मम मान तू
सन्मान तू हे भारता... ।।१।।

शास्त्र ऐसें शस्त्र तेजल
संस्कृतीच्या वंदना
तूच मौलिक मानवाची
प्राचीना अभिवंदना
आदर्शवत आचारता

अभिमान तू मम मान तू
सन्मान तू हे भारता... ।।२।।

शूरता निज वीरता
अन धीरता अभिप्रेरका
तूच ज्योती तूच दीपक
सद्विचार संप्रेरका
धर्मकर्म अन मर्म धारका

अभिमान तू मम मान तू
सन्मान तू हे भारता... ।।३।।

अभिमान तू मम मान तू
सन्मान तू हे भारता

मज करांनी आरती घे
देश देवा भारता ।।धृ।।

दि.२६/०१/२०२३
सकाळी ११.५२ वा.




## (२१)
## रती पुतळा देखणा

या सौंदर्या कसे मोजावे
कोणते ते परिमाण
नाही ठेविले बंधन त्याने
निर्मिताना तिज छान

रंग केतकी सारा ओतला
चंद्रासम मुखमान
तेज मोहवी इतूका गोडवा
मधुबाला अभिधान

सरळ सुंदरी जणू चाफ्याची
कळी नासिका जाण
गहिरे नयनही किती बोलके
विसरून जावे भान

पुन्हा पुन्हा तो पुन्हा पहावा
वाटे असा चेहरा
शृंगाराच्या दालनातला
तू हुकमी मोहरा

ती इवलीशी मधुरा जीवनी
डावीकडे झुकलेली
जाईजुईच्या हास्य कळ्या जणू
चांदणी नभी हुकलेली

नाजूक ऐशा अतिअलवार त्या
अदा तुझ्या मोहिनी
अभिनयातून सांडत जाते
चांदण्यास कामिनी

एका युगाची तूच स्वामिनी
रती पुतळा देखणा
असशील तेथून आजही फिदा
रसिक प्रिये देख ना

दि.२१/०२/ २०२३
सकाळी ०७.२३ वा.



## (२२)
## रंग प्रीत भरले

ओका बोका नाही
मी तर रंगलेला बोका
म्हणतो ना दिसतो कसा
रंगीत छानच! हो का !

खिडकीत समोरच्या
मनातली मनी
रंग तिला लावणार
सांगतो मी कानी

शुभ्र अशी गोड दिसे
अदा तिच्या भारी
मान वेळाऊनी पाहते
मनुली माझी घारी

आज तिला दूध दही
लस्सी ही मी देईन
रंग रंगलेल्या
बोळात जरा नेईन

घेत पिचकारी
उडवून तिच्यावरी
भिजवून देत माझ्या
रंगात तिला पूरी

मग अंग झटकेल
मिश्कील नजर पाही
शेपटीस वळव वळवून
नखरेच करीत राही

कित्येक दिवस मनी माझी
रंगलेली राहील
गोड किती ढंग तिचे
रंगमनी पाहील, मी रंगमनी पाहील

होळी अशी रंग देई
रंग प्रीत भरले
बोका ना एकटा मी
क्षण संगी उरले

दि. ०७/०३/२०२३
सकाळी ०८.५३ वा.
होळी व धुळवडीच्या रंगीत शुभेच्छा



## (२३)
## राधेश्याम रंगनाम

एक तुझा रंग हरी
चढतो तनुवरी
मग जातो मनामधे
तिथून अंतरी

आज रंगपंचमी
पंचप्राण रंगती
राधा ही खुलते कशी
प्रिया असशी संगती

मार पिचकारी भरून
रंग प्रीत वाटतो
भाव मनी प्रेमाचा
नभी घनुसम दाटतो

किती असल्या जरी गोपा
मीच हृदयरागिणी
छेड राग अनुरागी
मी तुझी अनुगामिनी

राधेश्याम रंगनाम
रंगुनी जरा
नित्य नवा वाहतोच
प्रीतीचा झरा

रंग असे चढले खरे
लिप्त अमर हो
प्रीत तुझी माझी सख्या
अजरामर हो

दि.१२/०३/२०२३
०७.५८ वा.
रंगपंचमी शुभकामना




## (२४)
## रंग असे कोणते

सांगू कसे राधे तुझा
रंग गडद किती
मनमोहन असलो जरी
मोहित तुजवरती

रूप तुझे विसरू कसे
रंग रंगलेले
नयन तुझे झुकलेले
भाव दंगलेले

अधोमुखी सुंदरी तू
मोहनाची प्रीत
तुजपुढती फिकी सारी
सारी जग रीत

रंगीत जे माळले तू
कुसुम मन सुमन
बघण्या तुज हरखलो मी
हरवले मज मन

इतकी मोही प्रियतमा तू
कसे सावरू
बिरुद ईश्वरी तरी कसे
मना सावरू

झालो मी राधामय
श्याम न उरलो
तूच सखी अनुपमा मी
तुजसाठी झुरलो

रंगपंचमी मनात
रोज खेळ खेळते
देखण्या प्रियेवरी
रंगश्री मेळते

युग थांबे मीही स्तब्ध
रंग असे कोणते
अनुरागी भिजलेली
प्रीत काही नेणते

दि.१३/०३/२०२३
सकाळी ०८.३४ वा.



## (२५)
## चिवचिव गाण प्यारे

कुठे गेली चिऊताई
चिवचिव ग निमाली
तुझी आठवण कुणा
सांग का ग नाही आली

अंगणात तुझं राज्य
पाण्यामध्ये डुबकीत
पंख ओले फडफड
दाणा तुझ्या ग चोचीत

झाड घर तुझे होते
परी घरी तू आमुच्या
काय कथा त्या सांगाव्या
काऊ आणिक चिऊच्या

तुझे घरटे इवले
इवलीच त्यात पिल्ले
घरात तू रहायची
हक्क दाखवीत टिल्ले

तुझा संसार सोन्याचा
तुझ्यामुळे बाल्य खेळे
मान वेळाऊनी तुझे
लाड लाडीकसे चाळे

किती नाजूक कोमल
चिवचिव गुंजायची
लागे मेंदीत टाकाया
विष्ठा आम्ही धुंडायाची
रंग चढत होता ग
जरा हातच्या मेंदीत
जगण्यात चिवचिव
ऊब छताशी थंडीत

नाही आताशी तू येत
का ग रागावली काय
निसर्गाला हानी केली
माणसानं ते अपाय

हाती मोबाईल आता
नाही सजीवांची जाण
किती घातक लहरी
वातावरणही घाण

माझी खिडकी रिकामी
रिकामेच आता छत
अवखळपणा नाही
बालपण यंत्रवत

द्यावे सोडून हे सारे
दोस्त तुम्ही पुन्हा यारे
सवंगडी जीवभाव
चिवचिव गाण प्यारे

दि.२०/०३/२०२२
सायं ०६.११ वा.
जागतिक चिमणी दिन

## (२६)
## श्रीमंती कशाची

असे श्रीमंती कशाची
अंगणातल्या गोठ्याची
हंबरते धेनु माये
वत्स लडिवाळ चाळे

वाहे गोरसाची गंगा
बाळगोपाळांचा दंगा
लोणी चाटतो श्रीहरी
गाय धन्य गे भूवरी

स्वर्गी कामधेनू आहे
सुरभीही तीच पाहे
देवदुर्लभ हे तक्र
लोणी घृत दीर्घायुषे

प्रिय विष्णुस जशी ही
दत्तगुरूंचे निधान
साऱ्या देवांची वसती
आहे तिच्यातंच धाम

देह मानवी पोसते
तनमन स्वस्थ राहे
देई धनाचे ऐश्वर्य
दुग्ध अमृताने वाहे

तिची नजर कनवाळू
वासरास चाटणारी
चला पुजू या वारसा
वसु बारस हो दारी

दीप लावूनीया दारी
नैवेद्यास तिज चारी
देई आशीष मधाळ
गाय समृद्धी प्रसारी

करू आरंभ दिवाळी
संस्कृतीची मांदियाळी
पर्व प्रकाश पसरे
उत्सवाची दिपवाळी

दि.१२/११/२०२०
सकाळी ०९.४५ वा.




(२७)

## एक युगातली माय

नाव सिंधू तसे तिचे
हृदयही हो अगाध
ताई झाली जगताची
अन...
पोरकी लेकरं सनाथ

झाली आबाळ जीवाची
साथ जोडीदाराची ना
लेक जन्मास घाली
माय गोठ्यात झाली ना

आधी आपण अनाथ
एक लेक पदरात
साऱ्या अनाथांच्या साठी
पान्हा फुटला उरात

किती दुःख साठविले
सागराच्या सम तळी
कणखर बाणा तिचा
भाग्य माय होणं भाळी

कसं विसरू तुला ग
माय अनाथांची आई
पाळण्यात रडणाऱ्या
बाळ ओठी हाक माई

माझी प्रेमळ ती माई...
उगा केलीस तू घाई...
अशी भेटणार नाही...
आता कुणाला तू आई...

आज रडली पद्मश्री
शांत कविताही झाली
एक युगातली माय
कायमचीच निमाली

दि.०४/०१/२२
१०.२३ वा.



## (२८)
## नमो प्रभो श्रीराम

अंतर्नादातुनी उमटतो नाद एक श्रीराम
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम
।। धृ ।।

अवतरला तू भूतली सातवा विष्णूचा अवतार
कौशल्या दशरथ नंदन तू रूप तेज साकार
मर्यादा पुरूषोत्तम आणिक संयम दुसरे नाम
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम
।।१।।

बाल्य सुखाचे राजकुमारा मग कर्तव्या प्रयाण
विश्वामित्रांसवे जाऊनी राक्षस ध्वंस महान
उचलून धीरे शिवधनु वरीयले जानकी भार्या जाण
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम
।।२।।

कैकेयीसी देऊन वर ते राज्य नव्हे वनवास
पित्राज्ञा मानुनी निघाला वर्ष चौदा वनी वास
सवे लक्ष्मण पाठीराखा अर्धांगीचे धाम
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम
।।३।।

निर्दायिले किती दुष्ट असुर ते सीता हरणे रावणही
अनुग्रहे तारीले सुग्रीवा शबरी अहल्या बिभीषही
भक्त श्रेष्ठ लाभला हनुमत सेतू कार्य साधिले महान
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम
।।४।।

परतुनी आला अयोध्येस तू रामराज्य निर्माण
प्रजा सुखास्तव निजसुख अथवा पत्नीसुखही गहाण
एकवचन एकपत्नी व्रताचा कार्य साधण्या एकच बाण
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम ।।५।।

पुन्हा येऊ दे राज्य सुखाचे एकच लाभो मग विश्राम
नित्य मनातून तूच वसावा दर्शन तव हे अति अभिराम
कर्तव्याला कधी न चुकू दे रामनामाने जीवा विराम
अंतरातुनी प्रणाम घ्यावा नमो प्रभो श्रीराम ।।६।।

दि.३०/०३/२०२३
दुपारी १२.२१ वा.
रामजन्मदिनाच्या हार्दिक रामकामना



## (२९)
## राम राम श्रीराम

पहा नाथ भूतली केवढी लगबग हो झाली
उजळून गेला राजमहाल नि अयोध्याही सजली

तुमचा जन्मोत्सव सुंदर हा लाडाचा रामलल्ला
राम नामाचा घोष ऐकला मोदे एकच कल्ला

सजली नगरी नगरी तुमच्या जन्माला आतुर
मध्यान्ही हो प्रकटले आपण झाला जनजन हर्षातुर

शतकांची संपली प्रतीक्षा मंदिर भवन व्हावे
राज्य आपुले अजून कांक्षिती लोक मनोभावे

गेले मी भारावून नाथा पावन साकेत नगरी
रामनामाची भरली आहे जीवा जीवाची घगरी

असे वाटते सार्थक मजला संपे बंदिवास
मिळेल घरकुल आपुले आपल्या पावन एक प्रवास

किती आवडते साथ मला ही नाथा अजरामर
सीताराम जप अभिधान उद्धरती पामर

मंत्र राम हा आत्माराम सीतेचे निजधाम
सदोदित गाते मीही राम राम श्रीराम

दि.३१/०३ /२०२३
सकाळी ०८.३७ वा.



## (३०)
## अक्षय हो आराधना

वैशाखाची आली तृतीया
अक्षय अक्षय सुख सांडत
अवतारांच्या दिव्य कथा अन्
अक्षय ऐसें गुण मांडत

अन्नपूर्णा, नर नारायण
परशुराम ,हयग्रीव जयंती
अक्षय पूर्ण मुहूर्त सुंदर
साडेतीन शुभ मुहूर्त असती

याच शुभदिनी श्रीव्यासांनी
आरंभिले महाभारत रचिण्या
श्रीगणेश लेखनिक होऊन
तत्त्व चिरंतन ऐसें कथिन्या

अक्षय दिनी उघडते द्वार हे
बद्रीनारायणा
वृंदावनी श्री बाके बिहारी
राऊळी श्रीविग्रह दर्शना

अक्षय शुभदिनी स्वर्गामधुनी गंगावतरण
विनाश पाप
स्नान जो करे मुक्ती लाभते
दान हवन अक्षय आपोआप

पितरांसाठी याच शुभदिनी
कृतकर्माचे अक्षय नाम
अक्षय टिकते लक्ष्मी आणिक
ऐश्वर्याचे अक्षय धाम

संस्कृती कृषीची जपण्यासाठी
बलरामाचे पूजन आज
कृतयुग संपून त्रेता आले
अक्षय सारे होतसे आज

म्हणून नव वास्तूचे क्रयण
वस्तू, सुवर्ण ,संपदा नि वाहन
सदा वाढती टिकून राहती
अक्षय पृथ्वी अक्षय गाहन

अक्षय प्रीती अक्षय रीती
अक्षय राहो साधना
अक्षय कर्मे अक्षय धर्मे
अक्षय हो आराधना

दि.२२/०४/२०२३
सकाळी ०७.२३ वा.
अक्षय तृतीया शुभकामना



## (३१)
## खरंय ना ग पत्रपेटी !

गंजत चालल्यात ग भावनाही
माणसाच्या
खंगत चालल्यात संवेदना त्याच्या
कुठे आहे ती आपुलकी, जी
शब्दातुन पत्रात उतरायची
आधार, सोबत, साथ सारं काही
निःशब्द करायची

प्रगती झालीय म्हणे ग बाई आता
खूप सारी
हातात यंत्र आलेत अन सुखं उभीयत
म्हणे दारी

आपलं आपलं पाहण्याची कसली
वृत्ती बळावलीय काय माहित
आता नातलग, सखे सोयरे कशा
कशाला फारसे लागतच नाहीत

तू नाही का सगळ्या भावनांना
आपल्यात साठवायचीस
जशाच्या तशा त्या जपून पुढे पुढे
पाठवायचीस
तूही आनंदायचीस ,खिन्न व्हायचीस
म्हणे पत्रातल्या शब्दांनी
आता तुझ्याकडे कोणीच फिरकत
नाही आपल्या पावलांनी

किती वाट पाहतेस ना ग गावी
असलेल्या एकट्या आईसारखी
पडेल कधी तरी एखादं पत्र मनमोकळं
आणि नसतील नाती नात्यांस पारखी
येतो रोज पोस्टमन त्याची नोकरी
म्हणून तुला पाहण्यास
पण अश्रूच ढाळून जातो बघ रिक्त
कहाण्यात

नको अशी उदास होऊस ,भंगलेल्या
अवशेषांमुळे
काळजाची पडझड झालीय ग नव्या
विचारांमुळे
ख्याली खुशाली आता क्षणात
कळवता येते
शब्दांचे पसारे,भावनांचे पिसारे,
आवेगांचे धुमारे आता काय कामाचे

आतून पाहिले तर अशीच
मोडकळीला आलीयत मनं
सगळ्यांची
वरून फक्त मुलामे दिले आहेत त्यांनी
जे तुला मला नाही जमणार कधीच
आतून एक बाहेरून एक ,खरंय ना ग
पत्रपेटी !

दि.०१/०४/२०२३
सकाळी ०९.१२ वा.



## (३२)
## मस्तक झुकते मज गुरुचरणी

प्रसन्न मुद्रा गुरुरायाची
चिंता विलया जाय
कृपा बाबाजी होता आपुली
बाप तुम्हीच हो माय

किती लोक हे दुःखी कष्टी
येती घेऊनी व्यथा
सत्येंद्रनाथ गुरू अधिकारी मी
गाईन गुरू गाथा

लौकिक प्रश्न कितीतर सत्तर
गुरूरायाच्या कृपेचे अत्तर
लागे एकदा जीवनास मग
छत्र कृपेचे अलौकिक उत्तर

कृपाप्रसाद ज्या लाभे मानवा
नाही कसली त्यास वानवा
आयुष्याची सुवर्णरेखा
गुरुपदकमली स्वर्ग पहावा

तुम्हा पाहता बळ ये अंगी
आशीर्वाद हे नित हो संगी
जन्म सफल हो सफल ही वाणी
मस्तक झुकते मज गुरुचरणी

दि.१५/०५/२०२२
सकाळी ०५.४७ वा.



## (३३)
## कालिदासा आज ये जन्मा पुन्हा

कालिदासा आज ये जन्मा पुन्हा
ती तुझी जी मोहिनी रसिका मना
काव्यसंपदा अशी जी भावते
कालजयी कीर्ती तुझी दिसती खुणा

तू अलंकारास माळून ओवतो
उपमा तुझी अनुपम रसिक धन पावतो
शब्द शब्द बोलती रस भावना
विरहातलाही भरीशी अलगद घाव तो

आज आषाढातला पहिला दिनु
रामगिरीवर यक्ष विरही उन्मनु
विप्रलंभी अग्नी ज्वाळा जाळताना
मेघदूती प्रीतवाही तो घनु

कण्व मुनीच्या आश्रमातील कन्यका
त्या कथेतील प्रेम भाव नि धन्यता
शकुंतला दुष्यंत बोले निसर्ग ही
ती कथा विरही व्यथा अनुमान्यता

कन्योपदेश श्लोक चार मौलिक
पशुपक्षी पाडस प्रेम जे अलौकिक
जन्म भरताचा जरी ऋषी अंगणी
भारताचा भूप त्रिलोकी लौकिक

ऋतू रघु विक्रम कुमार मालविका जात
मेघदूत शाकुंतल जगविख्यात
कविकुलगुरु हे बिरुद बहु शोभते
कालिदास लेखणी अति अभिजात

पुन्हा रमव तू रसिकचित्ते रसरंगी
पुन्हा नाट्यभाव ते रुजू दे अंगी
पुन्हा बहरू दे ऋतू शारदावाणी
पुन्हा नव्याने काव्यसृष्टी दे संगी

दि.१९/०६/२०२३
सकाळी ०९.१३ वा.
आषाढ प्रथम दिवस,कालिदास
दिनाच्या हृद्य शुभेच्छा




## (३४)
## गुरु

गुरु ज्ञान मूर्तीमंत
गुरु तत्त्व नीतिमंत
गुरु अनादी कारण
गुरु नित्य कृपावंत

सर्जनाचे अंग गुरु
पोषणाचे ढंग गुरु
ब्रह्मा विष्णु महेशाचे
रूपरंग खरे गुरु

जन्म गर्भवासी होता
जी साकारते काया
ती आदिगुरु माय
जिचे रूप नित्य माया

शब्द अर्थ गूढ रूप
कल्पनांचे राज्य कळते
गुरु मातापिता नाव
सारे मूळ आकळते

ज्ञान कण कण जे देती
थेंब सागरात मोती
मूर्त गुरु पाठनात
दंग शिष्य सारे होती

आत्मरंग पांडुरंग
सांगे रूप ते अनंग
स्वामी धावे माझी माय
दत्तगुरु चिदानंद

झरे पाने फुले डोलून
तरु पर्वतांच्या राशी
निसर्ग गुरु ऐसा
त्याच्या नवनव्या मिराशी

संत महंत विभूती
तपो ज्ञान वयोज्येष्ठ
कणकण ह्या सृष्टीमधला
गुरु होतसे हो श्रेष्ठ

नम्र भावे वंदियेला
व्यासपूजनी तयाला
गुरु वर्णिण्या मी देख
काळजाचा बोरू केला

असो नित्य आशीषे हो
हात मस्तकी विराजे
चरणी ठेवताच शिर हे
एक शांती मना लाभे

दि.०३/०६/२०२३
सकाळी ०९.१० वा.




## (३५)
## आज दीप अमावस

आज दीप अमावस
दिवे उजळुनी लावा
ऋण परकट करून
जपू परंपरा ठेवा

काळजाची काजळी ही
ज्योत जळून संपता
तेल स्वतःला जाळतं
तेज पसरून जाता

सारं झिजल्याविना का
परकाशाचं हो कवतिक
जगामंदी न्हाई काही
असं मिळतं आपसुक

रात दिन जळताना
किती आनंद जयांना
सुख देत्यात जी लोका
कष्ट सोसणं तयांना

कधी ठेवू नये बाई
कुणा कुणाचंच देणं
देत राहतो परकाश
आज त्याला तेज देणं

देवा असाच असावा
माणसाचा बी जलम
सुख साऱ्यांना देताना
मन व्हावं की तलम

देह असाच घासावा
समद्यासाठी पाजळावा
जीव जाताना सुदीक
आसू मायेचा ओघळावा

दि.१७/०७/२०२३
सकाळी ०८.३१ वा.




## (३६)
## शुभ शुभ दसरा

माय भवानी  विजयादशमी
असुर संपवून झाली विजयी
सुटले सारे त्रास, जाहले मोकळे श्वास
आई तूच जीवाला आस

तू करिशी सीमांचे लंघन
पाप्यांच्या पापांचे उल्लंघन
आज तुझी विजयाची यात्रा
साजरा होतो सुवर्ण दसरा

आज दशानन गेला संपून
श्रीरामांच्या कृपेस पावून
रावणवृत्ती अशी संपू दे
विजयी दसरा निज धामातून

विजयासाठी पांडव निघती
शमीवृक्षावर शस्त्रे लपविली
आज काढली अन पाजळली
म्हणून शस्त्रपूजने चालती

जावे त्या सीमा ओलांडून
असुर भावना मग उल्लंघून
ओवाळून त्या रूपा घ्यावे
विजयादशमी सोने लुटावे

तुझ्या कृपेचे कांचन आई
पदरी मज भरभरून देई
श्रीरामा रे संपव रावण
कृष्णा सारथी जीवनी होई

असा विजय मग होवो साजरा
हासत येईल दारी दसरा
सण हे सुंदर अर्थही गहिरे
विसरा वैर नि चिंता विसरा
शुभ शुभ दसरा,शुभ शुभ दसरा

दि.२४/१०/२०२३
सकाळी ०७.३२ वा.




## (३७)
## सर्ग निसर्ग हासरा

सर्ग निसर्ग हासरा
सुंदर दुलई आवरण
कोमल करांनी जपू या
चला आपुले पर्यावरण

सूर्य उगवतो पूर्वेला
आभा पसरते जगण्यात
रजनी चांदण्या लेऊन
न्हाती धुती चांदण्यात

उडती आकाशी पाखरं
गाणी आनंदी गाऊन
वहाती नद्या धबधबे ही
झरे येती खळाळून

डवरून फुलांच्या गोंदण्या
डुलती झाडं न वेली ही
हिरवी तृणांकुरे बाळे
बिलगून आईला खेळती

सारे ऋतूंचे सोहळे
भाव तरल नि कोवळे
गंध मातीचा दिगंती
पंचप्राण सुखावले

सृष्टी माय अशी आपुली
देता कधी न थकली
आपण हानी पोचवता
ती त्या दुःखानं वाकली

नको खोदणं डोंगर
खोल जमीन पोखरणं
दूषित हवा पाणी वायू
विष हे निसर्गी घोळणं

पर्यावरण प्रेम माया
त्याला मायेनं जपावं
धरणी माईला आपुल्या
झोकं सुखाचं झुलवावं

दि.०५/०६/२१
सकाळी ०८.५३ वा.



## (३८)
## श्रीकर नाव हे सार्थ

कार्यातून जे ठसा उमटवून
करती प्रशासन गतीचे
मितभाषी कर्तव्यदक्ष हे
अधिकारी ख्यातीचे

वैद्यकीय शिक्षण घेऊनही
सेवा प्रशासनाची
कठीण परीक्षा प्रथम प्रयत्ने
गुणवत्ते येण्याची

महाराष्ट्र गाजवून दिधला
प्रथम क्रमांकाने जो
र्णीलि सहज गाठली
अधिकारी मानी हो

शासन पारितोषिक लाभे
उत्कृष्ट प्रशासक म्हणुनी
नव्या नव्या कल्पना राबवून
गतिमानता आणुनी

पंतप्रधानांनाही पडली
कार्याची ही भुरळ
दूर प्रसिद्धी पासून राहती
असे अधिकारी विरळ

कर्म हीच असे ज्यांची पूजा
श्रीकर नाव हे सार्थ
कर्मश्री हातात वसतसे
राष्ट्र होई कृतार्थ

अगणित देते तुम्हा जन्मदिनी
शुभेच्छांची मंजूषा
रोज नव्याने नित्य होऊ दे
जीवनी यश प्रत्यूषा

दि. ०९/०८/२०२३
सकाळी १०.५५ वा.
आदरणीय डॉ.श्रीकर परदेशी सरांना
काव्यमय शुभेच्छा



## (३९)
## पसरू दे तव कर्मसुगंध

कसे सांगू मी तुझे नि माझे
ऐसे धागे गुंतुन गेले
तू केले मजसी रे आई
जीवात जीवही गुंफुन गेले

तनुज जरी तू आत्मरंग मज
तूच माझिया सुरभित गंध
दरवळ जाईल दिशी दिशी बाळा
पसरू दे तव कर्मसुगंध

तुझे नि माझे नाते आगळे
ते नच केवळ देहबंधी
आत्मिक आहे गतजन्मीचे
परतून आले ऋणानुबंधी

तुझ्या पाऊली आनंदाची
झाली पखरण घरीदारी... अंगणी
तुझ्या रूपाने जगेन मीही
उगाळून जीवन हे चंदनी

तुझ्या सुखास्तव तुटते काळीज
शेवटचाही श्वास तुझ्यास्तव
लाभो तुजला मम आयुष्य
जगणे माझे तूच हे वास्तव

दि.२०/०८/२०२३
दुपारी ०१.३१ वा.



## (४०)
## चला करू या सण हे साजरे

श्रावणाची सुरुवात
सण नागपंचमीचा
कुटुंबाच्या रक्षणास
नागदेव पूजण्याचा

इतिहास सांगतो की
सर्पयज्ञ जो चालवी
ऋषी आस्तिके प्रसन्न
जनमेजया केले की

वर मागा म्हणताच
सर्पयज्ञ थांबविण्या
ऋषी मागणे ऐकून
ऐके राजा त्या मागण्या

दिस पंचमीचा होता
मास श्रावण पावन
कृष्णे याच दिनी पहा
केले कालियामर्दन

नागश्रेष्ठ जो अनंत
तोच मी हा जाण पार्थ
गीतेतून सांगे स्वयं
भगवंत हाची अर्थ

अनंत वासुकी शेष
पद्मनाभ कंबल तक्षक
शंखपाल धृतराष्ट्र कालिया
नवनाग हे पूजिता रक्षक

न कापणे वा चिरणे काही
भूमीला ना खणणे या दिनी
नागवस्तीची घेत काळजी
वारूळ जपणे भावे पुजुनी

नागप्रतिमा व वारूळ पुजता
दुर्वा आघाडा दुध अन् लाह्या
पुरणाचे उकडीचे दिंड
नैवेद्याला साखर खाया



सत्येश्वरी ने भावासाठी
नागपंचमीच्या आदल्या दिवशी
गतप्राण पाहून भावाला
शोक केला न भक्षिले काही

भाऊ दिसला नागरूपातून
म्हणून बहिणींचा उपवास
सासुरवाशीण येते परतून
श्रावणातला माहेर ध्यास

उंच चालतो झोका जैसा
सुख वाढू दे तसे जीवनी
खाली उतरे जैसा झोका
दुःख निचरू दे तैसे ग क्षणी

म्हणून रमते माहेरवाशीण
खेळामध्ये दंगून रंगून
हाती मेंदी चुडा नवा अन्
नवी वस्त्रे नवं स्वप्नी गुंगून

अशी संस्कृती भारतीय ही
मनामनाचा विचार करते
जीव जीवाला जपण्यासाठी
भाव फुलांनी हृदया भरते

चला करू या सण हे साजरे
जाणून त्यांची पार्श्वभूमी
आपण जन्म पावलो भारते
समृद्ध भारती मातृभूमी

दि.२१/०८/२०२३
सकाळी ०८.५४ वा.



## (४१)
## तेज भारत हा जाण

आज उतरले यान
चांदोमामाच्या घरात
किती युगांचे दाटले
स्वप्नं हळवे अंतरात

दिनराती मेहनत
कष्ट फळाला आलेत
आज तिरंगा पाहण्या
देव शहारू गेलेत

देवभूमीतून आला
दूत चांद्रयान झाला
वसुधैव कुटुंबकम्
नाद त्रिखंडी गाजला

दृष्ट काढावी असे हे
सारे शास्त्रज्ञ गोंडस
माय भूमीचा संदेश
गोड प्रज्ञान पाडस

भारताचं पडताच
अलगद हे पाऊल
स्वर्गी पोचली खुशी नि
देवकृपेची चाहूल

चांदव्याचे रूप कसे
समजायचे हो आता
एक पाय धरतीशी
एक शशीवर जाता

देश माझा अभिमान
तेज भारत हा जाण
तीट लावते तुला रे
गुणी तीन चंद्रयान

दि.२३/०८/२०२३
सायं ०६.३४ वा.
चांद्रयान ३ च्या यशस्वी मोहिमेसाठी
सर्व भारतीयांना चांदुल्या शुभेच्छा



## (४२)
## चंद्र मनातून जागा आहे

अजूनही चंद्रावर मन ते
मन चंद्राचे रूप पाहते
उपमांमधल्या राजसरूपा
रूप आगळे इथे राहते

असू दे की तो असला जसाही
युगायुगांचे नाते आहे
रूपावरती नाही सारे
भावनदी ओथंबून वाहे

रेशीमधागे घट्ट असता
वरपांगी रूपाचे काय
धरा चंद्रमा बंधु भगिनी
दाट मायेची साखरसाय

गावी त्याच्या असेल काय
जाणून घेण्या धरणी माय
सपुत भारती संतानाची
विजयी गाथा शिखरी जाय

चंद्र मनातून जागा आहे
चांदण्यातले देत दिलासे
आनंदाने जग स्वीकारील
भारतविक्रम देई खुलासे

दि.२४/०८/२०२३
सकाळी ०८.३७ वा.



## (४३)
## कसला लळा हा

कसला लळा हा खोल जिव्हाळा
मनात ओलावा
गतजन्मीचा बंध आगळा
आजही पाळावा

काय राहिले नाते अर्धे
म्हणुनी पुन्हा आली
पेनी घरची तू लाडाची
साऱ्यांची झाली

तुझ्याचवरती जीव जडविला
सखा बाप झाला
नचिकेतच्या गतजन्मीचा
ऋणानुबंध आला

भाग्येशही मग तुझाच झाला
मीही माय झाले
औक्षवणाने तुला कितीदा
कन्या मी म्हणाले

आज चालली साता समुद्रा
पल्याड भेटाया
आसुसलेला दादा तिकडे
तुला ग गाठाया

पुन्हा भेटू या तुला शुभेच्छा
दूर प्रवासाला
सुखरूप होईल सारे काही
ये घरी पुन्हा निवासाला
पेनू, पुन्हा निवासाला

दि.०५/१०/२०२३
सकाळी ०५.४८ वा.



## (४४)
## कोजागिरीच्या शारद राती

कोजागिरीच्या शारद राती
शांत चांदण्यात हृदये गाती
वेगळी आभा वेगळ्या छटा
चांदणी खुलून येतात नाती

उगा कुणावरी मन भाळते
का उगा कोणाला व्यर्थ टाळते
पूर्ण चंद्राच्या अमृती न्हाऊन
मनासी भरती तेंव्हा कळते

कुठले कुठले विचार छळती
भाव कसे कोणाला कळती
प्रीत विरही का अजुनी जळते
चांदण्यात धागे जे जुळती

किती वर्षांच्या सहवासाची
रात चांदणी भर आशेची
कुठल्या स्वप्नांच्या गावाची
कोजागिरी उल्हास नावाची

एक सुरेखशी शांत धुंदी
धुंदीमधली मनं आनंदी
कोण कशी मग घालू शकेल
उधानलेल्या क्षणी पाबंदी

दि.३१/१०/२०२३
रात्री ११.४७ वा.



## (४५)
## शुभदीपावली तुम्हा

नंदा कामधेनू आली
सागरमंथनी निघाली
जननी उत्पत्ती समृद्धी
अशी ओळखची झाली

गोमातेच्या हो शरीरी
देव नाना वसतात
कृषीसाठी गोवंश हे
वरदानं असतात

दुधदुभत्याची नदी
वाहताना हो अंगणी
दही ताक लोणी भरे
ओसंडून की रांजणी

तिच्या सहवासी मिळे
नित आरोग्य पर्वणी
संस्कारात गोदानाची
होत असते अर्पणी

दीपावलीच्या आरंभी
गाय वासरू पुजू या
सण उत्सव उत्साहे
नव्या पिढीत रुजवू या

शुभदीपावली तुम्हा
सारी संपदा वसू दे
घरोघरी भारतात
गाय सुखाने असू दे

दि.०९/११/२०२३
सकाळी ०९.२३ वा.




## (४६)
## धनत्रयोदशी आरोग्यधन साधण्यासी

अश्विन कृष्ण त्रयोदशीला
सागरमंथनी रत्न निघाले
लक्ष्मी माते सवे त्याक्षणी
धन्वंतरी देववैद्य ही आले

खरी संपदा आरोग्याची
म्हणून धन्वंतरी प्रकटले
आज तयांची असे जयंती
ज्यांना देवांनी पुजले

हाती घेऊन अमृतकुंभा
जरा मृत्युसम रोग ते हरण्या
शरीर त्रासते रोग उद्भवून
निरामय जीवनास करण्या

आज पुजावे लक्ष्मीमाते
सवे दिव्य हे वैद्य पुन्हा
करू प्रार्थना मनोभावे ही
नसो रोगराई हो कुणा

लक्ष्मी कुबेर आज पुजावे
संपत्तीची हो वर्षा
सुखे ते मग उपभोगण्याला
आरोग्यदान दे हर्षा

करू साधना आरोग्याची
जपू देह अन निरोगी मन
दे आनंदा दीपज्योती
उजळून जावो क्षण कणकण

दि.१०/११/२०२३
सकाळी ०७.४७ वा.
शुभ दीपावली



## (४७)
## दीपावली मंगल होते...

अभ्यंगाचे उटणे
काम क्रोध मळ सुटणे
तैल सुरभित चोळून देता
मार्दवाचे नाते जुटणे

उष्ण जल अंगावर पडता
शीत ऋतूची गंमत वाटे
सोबतीने आतषबाजी
उत्साह हा हृदयी दाटे

नव वसने वस्त्र सुरेख
तो गंध नवाळी देतो
लज्जत फराळी वाढविण्या
सण राजा दिवाळी येतो

साऱ्या नात्यांची येथे
एक उजाळी होते
तेवत्या दिव्यांच्या ज्योती
मंगल दीपावली येते

मन वाट पाहते नेहमी
अन स्मृती जागवून जाते
प्रत्येक दिवा आगळा
तेजाला सजवून जाते
दीपावली मंगल होते...

दि.१२/११/२०२३
सकाळी ०८.३५ वा.



## (४८)
## अंजलीत मी तेजा भरले...

पणतीमधल्या ज्योतीसाठी
एक दिवाळी विशेष
उजळून जाते तीही अनोखी
काही न ठेवता शेष

गोऱ्या गोमट्या पणत्या घासून
घराघरातील दिवे चमकती
विद्युतदीपही चमचम चमकून
घरादारावर असे दमकती

आकाशातील कंदील उंचच
उभारून जणू हसती गाली
नक्षत्रे मिटता अवसेला
ते ताऱ्यांना देती टाळी

तुळशी वृंदावनात कायम
सांजवात जी जळते आहे
देवघरी नंदादीपातून
भक्तीभावना कळते आहे

मिणमिणती चिमणीही हसली
माजघरी कोपऱ्यात बसली
कंदील आला काच ओढुनी
देवळीतली कमान ठसली

समई म्हटली चला करू या
सारे मिळुनी तेज आरती
रूप वेगळे रंग आगळे
नक्षी आकारा येईल भरती

अश्विन मास नि कार्तिक सीमा
ज्योत पेटता दीप तेवला
उत्साहाची नवी नवाळी
दिवाळी आंदण दिवा लागला

दिव्या दिव्यांनी दिवे लावले
दिव्य तेज भूवरी अवतरले
स्वर्गासम रोषणाईपुढती
सारे तमाचे डोंगर हरले
अंजलीत मी तेजा भरले...

दि. १३/११/२०२३
०८.०७ वा.




## (४९)
## एक दिवाळी किती आठवणी

आज पाडवा नाते जडवा
नव्या नव्या कोंदणी
जरा जरासा देत उजाळा
नवी नभी चांदणी

अश्विन संपून येता कार्तिक
बलिप्रतिपद होते
वामन अवताराची गाथा
थेट पुराणी नेते

नवीन उद्यम नव व्यापारी
नव्या खतावणी पुजू या
नवे आकडे नव्या हिशोबी
पुन्हा नव्याने रुजू या

औक्षवंत होण्या निजसाथी
पिता पुत्र वा कोणी
अभ्यंगाचे स्नान घालिता
सुवास दरवळ आणि

अर्धांगिणी ओवाळते आजच
आजच लेकीबाळी
किती अर्थ त्या एक सणाला
उजळून येई दिवाळी

सण वर्षाचा सण हर्षाचा
अजोड क्षण बांधणी
द्या प्रीतीची तबकी टाकून
अलगदशी ओवाळणी

जीव ओवाळून देती नाती
इथल्या तिथल्या गाठी
उगाच झटते का धडपडते
कुणी कुणाच्या साठी

एक दिवाळी किती आठवणी
माया ममता क्षण पाठवणी
एक दिवा ना आवली येथे
तेजासंगे सुख गाठवणी
होय दिवाळी स्मृती साठवणी

दि.१४/११/२०२३
सकाळी ०६.११ वा.




## (५०)
## पुन्हा एकदा दिवाळी

भारतीय संस्कृतीचे
मधुर पदर तलमातितलम
भावा बहिणीचेही नाते
दृढ पावन नितळातिनितळम

कार्तिक शुद्ध द्वितीयेला
होते दीपावली सांगता
कैसे बंध बंधु भगिनींचे
न च येई ते असे सांगता

आत चालते रेशीम भावन
किती खोल अन पक्के बंधन
दूर असो की असू दे जवळी
जाणवते निज हृदयी स्पंदन

काय करू अन किती करू मी
माझ्या बहिणीसाठी
भाऊ तळमळे तशी बहिणही
झटे भ्रातृसुखासाठी

मात पित्यांच्या स्नेहामधुनी
असे जन्मले धागे
रक्तासाठी रक्त ओढते
कुठे होत वरचढ प्रीत वागे

मानलेले बहीण भाऊ हे
रक्ताच्या पलीकडले
या नात्यासाठी स्वतः
यम यमीही अडले

आता वाटते  थांबू दे जरा
जाता जाता दिवाळी
मला बांधू दे ,जरा सांधु दे
पुन्हा एकदा दिवाळी
अविस्मरणीय अशी दिवाळी

दि.१५/११/२०२३
रात्री ०९.१९ वा.



## (५१)
## गुरुकृपेची मंजूषा

अंगाखांद्यावर रावे
बोलतात जे ते ठावे
पशुपक्षी जाणतात
सज्जनांची स्नेह गावे

खेळतात खेळ कोडी
जन्मोजन्मीची ही गोडी
संत संगती लाभता
भाव भाषेविण जोडी

जीव जीवास जाणती
गुरू आचार्य महती
स्मित हास्य सांगते ना
किती जन्माची पुण्ये ती

देह असू दे कोणता
आत ईश्वर मानता
चिन्हे खूण पटते हो
भेट अलौकिक होता

मुख प्रसन्न तेजाळ
गुरुवाणी हो मधाळ
भूतदया तत्त्व देही
साऱ्या जीवा प्रतिपाळ

गुरुराज विनवते
पायी स्थान मज द्यावे
गुरुकृपेची मंजूषा
दान मौलिक ते व्हावे

दि.३०/०५/२०२२
रात्री १०.४१ वा.



## (५२)
## तू सदा माझ्या मनाला भाळवावे

चांदण्यांच्या तेजबिंबा पाहिले का
तू तुझ्या त्या तेजकांती चांदव्याला
सांगताना तू मला का मोहवीशी
मी तुझ्या प्रीतीस राणी बांधण्याला

तू सदा माझ्या मनाला भाळवावे
चित्रकाराने कधी त्वा आळवावे
हास्य मोहाचेच जाळे सांग ना गे
मी असे का त्यात स्वतः गुंतवावे

ते तुझे दो बोलके जे नेत्र राणी
रोज माझ्या जीवनाचे छंदगाणी
हारतो मी रोज वेडे ते नशीले
पाहतो मी रोज त्यांना धुंद डोळे

दंतपंक्ती मोतियांची मांदियाळी
भाग्य बिंदीही लकाके जी कपाळी
ओष्ठ दोन्ही पाकळ्या की लोणगोळे
माधुरीच्या गोडव्याचे गोड चाळे

नासिकेची सोनचाफी मोहवेली
चांदणीही चांदव्याची खोवलेली
कर्णभूषा हीरपन्ने टांगलेले
तीळ काळा हा हनूची दृष्ट काढे

तू अशी जी लाजलाजू लाजलेली
गाज माझ्या सागराच्या आतली ही
ये कधी तू जीवनी हो संगिनी गे
अप्सरा ना कोणती, तू भावलेली

दि.१८/०५/२०२२
सायं ०५.०५ वा.




## (५३)
## मधुर माधुरी छबी

नको करू घायाळ असे कितीदा
मीही होतो पुन्हा तुझ्यावर फिदा
कुठून आणल्या अशा अप्सरी अदा
मी मोहामध्ये अडकून पडतो सदा

माहीत असते हास्य तुझे ते मधुर
तरी नव्याने रोज छेडिते सूर
स्वप्ना रमणी जाऊ नको तू दूर
मज प्रेमाला येतो प्रिये ग पूर

मीही विसरतो पुन्हा मला अन
तुझ्यात गुंतून जातो
कसे दुरावू तुजपासून मी
खेचत जवळी येतो

त्या ब्रह्म्याने सारी माधुरी
तुझ्यातच ओतली
खूण तयाच्या कलाकृतीची
पाहून तुजला पटली

असे वाटते पहातंच रहावे
मधुर माधुरी छबी
मिटता डोळे तूच तू दिसशी
उघडता पुढे उभी

दि.०३/०६/२०२२
दुपारी १२.१७ वा.



## (५४)
## सांडले हास्यात मोती

सांडले हास्यात मोती
मोतीयाचे चांदणे
रंगकांती रोहिणीसम
चंद्राला ते भुलविणे

दोन डोळे बोलती गे
तू जरी ना बोलणे
काय हे शर कामदेवे
एकवेळी मारणे

नेम त्याचा ना चुके
वय आमुचे जरी वाढले
वाढल्या ना प्रीतगोष्टी
चित्र मनी तव काढले

ही छबी मनमोकळी
जणू गंध वाहे मोगरा
कृष्ण झालो लाभली ना
राम श्रीयुत जाहला

पाहतो नुसते तिला नित
चित्र कोरून ठेवीले
माधुरीसम गोड हास्य
सांगा कोठे पाहिले

हास्य हे राहो चिरंतन
सुखफुलां ओघळणे
क्षण क्षणी पाहून तुजला
चांदण्या ओशाळणे

दि.०५/१०/२०२०
रात्री ११.२४ वा.



**(५५)**

**लता संजीवन**

सूर स्वर्गातला
धरी उतरला
अमृत जाहला
स्वर बहरला

काठ संघर्षाचे
सूर ते हर्षाचे
मल्मली स्पर्शाचे
गीत उत्कर्षाचे

कन्यका वाणीची
धन्य स्वर्गाणी ती
सूर वीणेतले
शारदेच्याच ती

रस सारे पहा
गीत सारे अहा
भावकोमल हा
लता गाण्यातला

गान सरस्वती
चिंब सूरात ती
नाहते विश्वही
स्वर गंगेतुनी

स्वर चिरंतन
लता संजीवन
असे अलौकिक
रत्न भारताचे
रत्न भारताचे

शब्दांजली आदरणीय लता दीदींना
दि.०८/०२/२०२२
१०.३५वा.




## (५६)
## ऐक माधुरी धडधड हृदयी

असो अवस की असो पौर्णिमा
तुझ्या हास्याचे पडे चांदणे
ऐक माधुरी धडधड हृदयी
या दिलाचे काही सांगणे

अधर दळे ती आखीवरेखीव
शुभ्र कळ्या दातांच्या साचीव
सांडून मोती त्यात हासते
तू कोणी अप्सरा भासते

कसे तुला ग जमते इतके
सुंदर दिसणे सुंदर हसणे
लोभसवाणे रूप लाभले
एकटक तुज न्याहाळत बसणे

डोळ्यांमधुनही ओसंडते ते
हास्य वैभवी चित्र रंगते
सौंदर्याची तू मधुराणी
दिव्य कांतीचे अंग अंग ते

रोज सकाळी छबी देखणी
उमटून जाते अशी या मनी
तिथेच थबकून जातो मीही
हास्य तुझे शिंपले अंगणी

काय पुण्य त्या श्रीरामाचे
घबाड लागे किती जन्माचे
चाले निरंतर माझी साधना
स्वप्नी तरी तू जरा थांब ना

दि.१४/०८/२०२२
सकाळी ०८.२२ वा.



## (५७)
## एकंच सापडला मास्क

एकंच सापडला मास्क हाती
कसे बांधावे तोंडावरती
चाळे आपुले चंचल खोड्या
सुटेल मारत जाता उड्या

आली कसली महामारी ही
मिचमीच डोळे चिनी विखारी
माणूस मुसक्या बांधून फिरतो
प्राण्यांनाही भिती बिमारी

तरी बरे दूर आपण राहतो
जंगलामध्ये धावत असतो
जीवन सुंदर होते आपुले
वनात ताण हा असला नसतो

मानव संपर्कातचि नव्हता
सगळे जंगल सुखाची भरती
पण कुठे काय उरले तेथे
फळे फुले नि झाडे मरती

पाणवठेही सुकले सारे
जंगल तोडून बांधली घरे
आता खाण्याला आणि पिण्याला
मानव वस्तीविना ना खरे

इकडे जो तो बांधून तोंडा
सुकला आहे माणूस सगळा
चिंता त्याच्या मनात भिरभिर
रोग काय हा कसा आगळा

जवळ त्यांच्या जातो आपण
जपू या त्यांच्या रोगापासून
मास्क अजून एक मिळवू आणिक
हिंडत जाऊ तोंडा बांधून

ऐक बाळा तू ऐक आईचे
मास्कविना ना कुठे जायचे
सोड ती दोरी चावू नको ना
त्यानेच घट्ट मास्क लावायचे

तुला कसे मी जपू सोनुल्या
अंतर ठेवून राहा बरं पिल्लूया
माणूस काही देवो न देवो
रोग पीडा देतो दुसऱ्याला

दोन हात दुरी आहे जरुरी
मास्क लाव तू चेहऱ्यावरी
थांब आणखी एक आणते
मग जाऊ त्या वसतीवरी

दि.२६/१२/२०२०
सकाळी १०.५९ वा.



## (५८)
## एक सुगंधी गुढी मनातून

कुहू कुहू बोले प्रभात झाली
वर्षप्रतिपदा हासत आली
क्षितिजावरती स्वागत करतो
दिनमणी आणिक उषा उगवली

रंग वेगळे त्या तेजाचे
पसरून दशदिशी नवं चैतन्ये
जरी वाटते सकाळ झाली
नवीन संवत्सर ती व्याली

सृष्टी साकारिली ब्रह्म्याने
वसुंधरेवर जीव डोलले
सुरू जाहली गणना काळाची
क्षण क्षण काही कर तू बोलले

नको व्यर्थ मग काळ दवडण्या
करू या काही नवं संकल्पा
गुढी उभारू नवं कार्याची
नवीन रचू या कल्प सुकल्पा

आनंदाची गुढी गगनातून
उंच लहरू दे विजय पताका
श्रीरामाच्या गृह आगमने
रम्य प्रजाजन अभिराम स्वागता

इतिहासाच्या लखळख ज्योती
हृदयामध्ये दरवळ घुमतो
एक सुगंधी गुढी मनातून
उभारून तिज परिमळ रुमतो

शोभन नामक संवत्सर हे
शोभून जावे सारे कणकण
पहा उगवले जणू नव्याने
आज गुढी होऊन हे तनमन

सार्थ होऊ दे नाम शोभनसे
घडू दे सारे शोभन शोभन
पुन्हा नव्याने नित्य चालू दे
आत्मरंगाचे शोधन शोधन

दि २२/०३/२०२३
सकाळी ०६.५१ वा.
वर्षप्रतिपदा,गुढीपाडवा
शुभकामना



## (५९)
## चला दिवाळी करू साजरी

पुराण भागवत सांगे महत्व
स्त्री सन्मानासाठी
प्रागज्योतिषपुरी दुष्कृत असुर तो
भौमासुर वधासाठी

नाव तयाचे नरकासुरही
होते प्रथित दुष्कर्मे
देव मानवा पीडादायक
वृत्ती सदाची अधर्मे

तरी सोसले कष्ट तयाचे
साऱ्यांनीच गुमान
सोळा सहस्र नारी डांबिल्या
कारागृही  किमान

ब्रह्मदेवाच्या वरे मातला
राक्षस क्रूर महान
बंदीवासातील साऱ्या स्त्रियांशी
विवाह करणे काम

दुर्ग वेढली ज्योतिषपुरी ती
अजिंक्य होती नित्य
देवमाता अदितीची कुंडले
वरुणछत्र हिरावले हे सत्य

गांजित होता साऱ्या साऱ्यांना
वध करणे निश्चित
स्त्री अत्याचारी जो राक्षस
कृष्णे पाडिला निपचित

युद्धकुशलिनी सत्यभामा ही
रथ चालक झाली
मार राक्षसा पृथ्वी कन्या
वीरवती वदली

नरकासुर वध केला छेदुनी
देह दोन तुकडे
सोळा सहस्र नारी जाहल्या
मुक्त साऱ्या इकडे

कोण तयांचा करील स्वीकार
कोण येई वरण्या
श्रीकृष्णाने पत्नी केल्या
प्रतिष्ठित करण्या

मरता मरता वर मागितला
पहाटे करी जो स्नान
तुझ्या कृपेने माझ्या स्मरणी
नरक पीडा ना जाण

नरकासुरला वर तो दिधला
म्हणून पहाटे उठणे
अभ्यंगाच्या मंगल स्नानी
सत्कर्माचे उटणे

आदल्या मध्यरात्रीपासुनी
दूषित वातावरण
चंद्रनाडीचे सूर्यनाडीतील
स्थित्यंतर हे कारण

पाताळातील प्रक्षेपित नाद
कंपन वाईट लहरी
विस्फुटित या लहरी नाशीन्या
स्नान ब्रहमुहूर्ता प्रहरी

दिवे तुपांचे उजळून तेंव्हा
रजतम कण विघटन
वाईट कणकण जातो नाशूनी
हेच नरकासुर निर्दालन

असुर शक्तीचा दीपतेजाने
प्रत्यूषी संहार
मुक्त जाहली पुजा लक्ष्मी
शुभ नववर्षा स्वीकार

नरकासारख्या वाईट गोष्टी
नष्ट करून जगणे
पुढे शुभाचे दीप पेटवून
सदवृत्ती धरणे

इतकी महान ही आपुली संस्कृती
जपणे कर्तव्य
चला दिवाळी करू साजरी
तेज पसरू भव्य

दि.२४/१०/२०२२
सकाळी ०७.५३ वा.
नरकचतुर्दशीच्या हार्दिक शुभेच्छा



## (६०)
## दिवाळी, तूही तशीच रेंगाळशील

कशी मी सावरू लगेच
दिवाळीतल्या खुणा न खुणा
अजूनही बोलतो किती
प्रत्येक दिवा पुन्हा पुन्हा

उजळले कालपर्यंत
तुझे घर तुझे अंगण
सुवासिक सुगंधातून
दरवळलेले मस्त चंदन

उटण्यातील प्रत्येक पदार्थ
अजून लिप्त तुझ्यावर
नकोनं येवो आळ आता
संपली दिवाळी असा माझ्यावर

आकाशकंदील अजूनही
साक्षी होत जळत आहे
रोषणाईची चमकदमक
अजूनही फळत आहे

दारात बांधलेला किल्ला
अजिंक्य वीरासम राजीआहे
दिवाळीतल्या फराळाची
चव अजून ताजी आहे

औक्षवणाच्या तबकातील
ओवाळणीचे स्मित हास्य
दिव्यांच्या ज्योतीचे
तेजस्वी लाघव लास्य

फराळाचे डबे अर्धेमुर्धे
कढयातून तळलेले तेल
मनाशी मनाचे नटण्याचे सजण्याचे
उजळून चालणारे खेळ

नेसलेल्या वसनांच्या
कुठे अजून घड्या केल्यात
अलंकारही बाहेरच
अत्तरकुप्या अर्ध्या झाल्यात

साऱ्या साऱ्या आठवणी
अशीच कशी सावरून घेऊ
दिवाळी संपली म्हणवत नाही
कशी मी दिव्यांना आवरून घेऊ

वसुबारस ते भाऊबीज
सहा दिवस मिरवलीस
अगं अगं दिवाळी
मनामनात एक पणती गिरवलीस

ती तशीच जळत राहील
अखंड ज्योत तेवत तेवत
दिवाळी, तूही तशीच रेंगाळशील
खाणाखुणा ठेवत ठेवत

म्हणून म्हणते दिवाळी संपली
असे मला म्हणवत नाही
दोन डोळे दोन ज्योती
दिवाळी संपली .
असे काही जाणवत नाही
असे काही जाणवत नाही

दि.२७/१०/२०२२
सकाळी ०७.२७ वा.

## (६१)
## मुजरा घ्या मानाचा

तळ मनाचा नितळ केवढा
पारदर्शी हे कर्म
उत्साहाने प्रेरित करणे
कर्तव्याप्रत धर्म

जाण गुणांची कदर मनांची
वीण घट्ट नात्यांची
जीवमात्र हो संगे सोयरे
काळजी त्या पक्ष्यांची

निसर्ग सोबती अंगणी मनी
निखळ प्रेम वाटले
आव्हानात्मक परिस्थितीचे
पांग सहजी फिटले

कर्मयोग पुरेपूर पाळला
कृष्ण पाठीशी जणू
एक सूर कर्तव्यकठोर नि
संवेदना वेणु

योद्धा कणखर लढवैय्या तुम्ही
माणूस मृदुल मनाचा
गौरवशाली भविष्य दिधले
मुजरा घ्या मानाचा

दि.१६/११/२०२२
सकाळी १०.४१ वा.
श्री.किशोरजी तवरेज ,उपसंचालक
भूमी अभिलेख, पुणे यांच्या निवृत्ती
निमित्त सस्नेह काव्यभेट

## (६२)
## मुजरा घ्या मानाचा

तळ मनाचा नितळ केवढा
गोपनीय हे कर्म
राज्य गुप्तवार्तेच्या खाती
कर्तव्याप्रत धर्म

जाण गुणांची कदर मनांची
वीण घट्ट नात्यांची
मित्र रांगडा निडर आमुचा
गोडी समाजकार्यांची

लोकचळवळी मदतनीस हा
संस्था पदाधिकारी
धैर्यशील निधड्या छातीचा
औषध जणु गुणकारी

पिता मायाळू मित्र कनवाळू
सेवक निष्ठावंत
असाच रहा रे मित्रा सदैव
पुढेही तू यशवंत

योद्धा कणखर लढवैय्या तू
राजेश मृदुल मनाचा
गौरवशाली भविष्य आहे
मुजरा घे  मानाचा

दि.०२/१२/२०२३
सायंकाळी ०६.३८ वा.
श्री.राजेशजी जाधव ,
प्रतिवेदक राज्य गुप्तवार्ता
विभाग,(श्री.हेमंत लेदाड  यांच्या
मित्राच्या)  निवृत्ती निमित्त सस्नेह
काव्यभेट



## (६३)
## न्हाऊन निघू प्रकाशी

येतील कधीतरी अशी शुभांच्या
मधुनी घडुनी ग्रहणे
जसे ग्रासणे तसे मुक्तही
त्यातून नक्कीच होणे

जाता आपण उत्कर्षाप्रत
कुणी लांछना टपते
तरीही आपुली आशा न सोडू
तीच मनाला जपते

छाया काही कळत नि नकळत
पाठलाग ज्या करिती
कधी तेजाने दिपुनी डोळे
त्या सुद्धा न उरती

कधी तरी सरशी त्यांची अन
ग्रहण लागते काळे
तेज स्वभाव न संपवू शकतील
भविष्य आणी उजाळे

म्हणून असू दे चांद्र पौर्णिमा
की अवचित ही अमावस
तेज वारसा जपू या हृदयी
कसले संकट कसले सावट

पुन्हा नव्याने वर्ष हे उगवेल
नवा पाडवा येईल
नवीच गणती नवीन स्वप्ने
देत उराशी राहील

आतला दिवा विझू न द्यावा
अखंड उजळो दिवाळी
खुणा तयांच्या चमचम मनी त्या
सरेल रात्र ही काळी

उष:काळ होताच प्रभाती
पुन्हा सूर्य आकाशी
रात्री चंद्रमा देई चांदणे
न्हाऊन निघू प्रकाशी

दि.२५/१०/२०२२
सकाळी ०९.२३ वा.
भाकड दिवाळी



## (६४)
## लक्ष्मीपूजन करता श्रद्धेने

अश्विन अमावस्या शुभलक्ष्मी पूजनाचा दिनु
संचारते लक्षुमी सांजेला, निवास शोधे जणु

झाली मुक्त जी बंदी होती ,बळीराज कारागृही हो
श्रीविष्णूने वामन रूपी सोडविले तिज हो

जिथे साधना श्रीविष्णूची लक्ष्मी तिथे नांदे
उतू नका कधी मातु नका तुम्ही संदेशा नित सांगे

चरित्र ,कर्तव्याची दक्षता, संयम श्रमनिष्ठा
भक्ती ,क्षमा आणिक स्वच्छता, तेथ गुण प्रतिष्ठा

समृद्धी अन ऐश्वर्याचे प्रतीक लक्ष्मी असते
जेथे श्रमाची किंमत आहे तेथे लक्ष्मी वसते

सायंकाळी तिच्या पूजनी स्वस्तिक आरेखावे
अक्षत निर्मित कमल अष्टदल अथवा रेखावे

त्यावर करुनी प्रतिष्ठापना रम्य रमेची हो
धने ,गूळ,साळी लाही ,बत्ताशे ठेवी प्रसादी हो

चलन रुपये रूपेसोने रत्ने संपदा पूजन हो
गृहलक्ष्मीचा राखता आदर खरे ते पूजन हो

अशी दिवाळी सुविचारांचे दीप दीप लावते
किती आदर्श ही संस्कृती आपुली मनी भाव पावते

अन्न जपावे आरोग्यही अन लौकिक समृद्धी
लक्ष्मीपूजन करता श्रद्धे, घरीदारी रिद्धी सिद्धी

दि.२४/१०/२०२२
सायं ०५.५७ वा.



(६५)
## सदैव घडू दे तुझी अर्चना

वंदन देशा तू परमेशा
तुझेच चिंतन परात्परेशा
तुझ्या रक्षणा साठी माझ्या
पंचप्राणज्योती तत्परशा

तनमनधन हे तुझ्याच कामी
तू असशील तर असूच आम्ही
तूच पिता अन तूच माता ही
पुत्र तुझे हे भारतीय की

भाषा विविधा शोभे भारती
मनांमनातून तुझी आरती
शहिदांच्या त्या रक्तावरती
वंदे मातरम् मंत्र कोरती

अमृतमय हे संवत्सर जे
महोत्सवाचे स्वरूप सुंदर
स्वातंत्र्याच्या कळ्या उमलल्या
देऊन बलिदानाने तत्पर

ध्वजा तिरंगा फडकत राहील
यशकीर्ती तव दिगंत जाईल
जगणे मरणे तुझ्याचसाठी
सार्थक होणे तुझ्याचसाठी

देशासाठी केले काही
अशीच होवो माझी सर्जना
जय हिंद गरजते अशी गर्जना
सदैव घडू दे तुझी अर्चना
सदैव घडू दे तुझी अर्चना

भारतदेशा,घ्यावी वंदना
घ्यावी वंदना..

दि.१४ /०८/२०२२
रात्री ११.२० वा.
स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित
मनःपूर्वक शुभेच्छा।




## (६६)
## तुझी माझी मैत्री

तुझी माझी मैत्री डोलावी डोलावी
गूज सारे तुज बोलावी बोलावी
तुझी माझी मैत्री...

तुझी माझी मैत्री जगण्यात मजा
विसरून सारे रुजण्यात मजा
तुझी माझी मैत्री...

तुझी माझी मैत्री डगर आधार
उंच नभी ती कधी ना माघार
तुझी माझी मैत्री...

तुझी माझी मैत्री गप्पा नि गोंधळ
निवांत क्षणात पालवीची सळसळ
तुझी माझी मैत्री...

तुझी माझी मैत्री शब्दावीण
घट्ट नात्याची आपुल्या वीण
तुझी माझी मैत्री...

तुझी माझी मैत्री दुःख सफाचाट
तुझ्या या शब्दात शक्ती अचाट
तुझी माझी मैत्री...

तुझी माझी मैत्री डोळ्यात सुख
कधी न भागेल असली भूक
तुझी माझी मैत्री...

दि.०७/०८/२०२२
दुपारी ०४.११ वा
जागतिक मैत्र दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

# लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**
  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)
  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५
  ई-मेल : dr.manjushak@gmail.com
  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश (प्रासंगिक), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - रूप-स्वरूप, श्रीरंग, कृष्णकांत, (प्रासंगिक) - आंदण, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (चंद्र) - सुधांशु, (सूर्य) - दिव्यांतरी, (प्रीत - तिच्या मनातील कविता) - नादश्रुती, श्वेता, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेंव्हा, (प्रेम - त्याच्या मनातील कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) - अळुमाळु, सुरभी, (पशु) - खाणाखुणा, (पक्षी) - वैष्णवी, (स्त्रीजीवन) - स्वामिनी, मृणालिनी, (धरती-आकाश) - प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>‘प्रकाशवाटा’ या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी ‘प्रकाशमार्गा:’ | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री – डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १000 पेक्षा जास्त
- प्रवचने : ५00 हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १00 हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५२
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ५१
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४0
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २00 हून अधिक
- पुरस्कार : २00 पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : 0५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : 0४

• • •